महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय, लातुर
अंबाजोगाई रोड, लातुर- ४१३५१२ शाखा:-आस्थापना
फोन : ०२३८२-२४३००० फॅक्स : ०२३८२-२४३६३३ ई-मेल : sp.latur@mahapolice.gov.in

दिनांक ०६ .०३.२०२६

# प्रेस नोट

## वाहन कौशल्य चाचणीकरीता गैरहजर उमेदवारांकरीता सुचना

पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर जिल्हा आस्थापनेवरील चालक पोलीस शिपाई भरती सन २०२४-२०२५ भरती प्रक्रियेमध्ये **"वाहन कौशल्य चाचणीकरिता " पात्र ठरलेल्या** उमेदवारांची दि.०४.०३.२०२६ ते दि.०७.०३.२०२६ या कालावधीत पोलीस मुख्यालय, बाभळगाव, लातूर या ठिकाणी कौशल्य चाचणी घेण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने सर्व उमेदवारांना कळविण्यात येते की, चालक पोलीस शिपाई भरती सन २०२४-२०२५ भरती प्रक्रियेमध्ये " वाहन कौशल्य चाचणी " दिनांक ०७.०३.२०२६ हा शेवटचा दिवस आहे. तसेच दिनांक ०४.०३.२०२६ ते ०६.०३.२०२६ या कालावधीमध्ये " वाहन कौशल्य चाचणी " करीता वैदकीय व इतर कारणास्तव दिनांक बदलून मिळणे बाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने तसेच गैरहजर/अनुपस्थित उमेदवारांना याव्दारे सुचित करण्यात येते की, आपणास या आस्थापनेवरील चालक पोलीस शिपाई भरती २०२४-२०२५" वाहन कौशल्य चाचणी " करीता दि.०७.०३.२०२६ रोजी **एक वेळेस अंतिम व शेवटची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.**

तरी **" वाहन कौशल्य चाचणी " करिता गैरहजर/अनुपस्थित** उमेदवार यांनी **दिनांक ०७.०३.२०२६ रोजी सकाळी ०५.०० वाजता** पोलीस मुख्यालय बाभळगाव लातूर येथे **" वाहन कौशल्य चाचणी "** करीता उपस्थित रहावे. तसेच दि.०७.०३.२०२६ रोजी **" वाहन कौशल्य चाचणी " करिता** सकाळी ०८.०० वाजेनंतर येणाऱ्या उमदेवारांना संधी मिळणार नाही,याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**अमोल श्री तांबे** (भापोसे)
पोलीस अधीक्षक, लातूर

Scanned with OKEN Scanner